CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

प्रहार । मुंबई । गुरुवार, ५ डिसेंबर २०२४

# जमिनीवीर डेब्रीज टाकणाऱ्या डंपरचालकांवर सिडकोकडून कारवाई

◆ पनवेल (वार्ताहर):

सिडकोने संपादित केलेल्या जमिनीवर आणि भूखंडावर मानवी आरोग्यास धोकादायक आणि पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रीज टाकणाऱ्या डंपरचालकांची सिडकोकडून धरपकड सुरूच आहे. सिडकोच्या पथकाने गव्हाण येथील एमटीएचएल लेबर कॅम्पलगत डेब्रीज टाकण्याच्या तयारीत असलेल्या ३ डंपरवर कारवाई करून ते जप्त केले आहेत. तसेच सदर डंपरवरील चालकांना ताब्यात घेतले आहे.



सिडकोने संपादित केलेल्या भूखंडावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत असून, सदरचे डेब्रीज मानवी आरोग्यास धोकादायक आणि पर्यावरणास हानिकारक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सिडकोच्या भूखंडावर टाकण्यात येणाऱ्या अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग आणि पोलीस पथकाकडून सिडकोच्या जमिनीवर अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्या डंपर चालकांविरोधात कारवाई करण्यात येत आहे. गव्हाण येथील एमटीएचएल लेबर कॅम्पलगत सिडकोच्या जमिनीवर मानवी आरोग्यास हानिकारक असलेले डेब्रीज टाकण्यात येत असल्याची माहिती सिडकोच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार सिडकोच्या पथकाने गव्हाण येथे धाव घेतली असता, त्याठिकाणी तीन डंपरमधील मानवी आरोग्यास आणि हानिकारक असलेले डेब्रीज विनापरवाना खाली करण्यात येत असल्याचे आढळून आले. त्यानंतर सिडकोच्या पथकाने तिन्ही डंपर ताब्यात घेऊन डंपर चालक इरसाद झियाउद्दीन शेख, अकील शकील अहमद, शकील अहमद मोहम्मद सुल्तान अन्सारी यांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईनंतर सिडकोच्या पथकाने बेकायदेशीरपणे डेब्रीज टाकणाऱ्यांविरुद्ध उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Dec 05, 2024

# ऐरोलीत अनधिकृत बांधकामावर हातोडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** ऐरोली सेक्टर १ येथील साईनाथ वाडीत अनधिकृत आरसीसी इमारतीच्या बांधकामांवर सिडकोच्या अतिक्रमण विभागाने बुधवारी कारवाई करून दुपारी बांधकाम निष्कासित केले. सिडकोच्या वतीने बांधकाम जैसे थे स्थगित ठेवण्याच्या सूचना देऊनही आरसीसीचे बांधकाम सुरूच ठेवल्याने कारवाई केल्याची माहिती सिडकोच्या अतिक्रमण विभागाने दिली.

ऐरोली 'जी' विभागात ऐरोली गाव, साईनाथ वाडी सेक्टर १ येथील सर्व्हे क्र. ३, ५ आणि ७ या भूखंडावर बांधकाम धारकाने ९५८.४० चौ. मी. क्षेत्रफळाचे अनधिकृत इमारतीचे आरसीसी कॉलम उभारण्याचे बांधकाम सुरू होते. या प्रकरणी चालू बांधकाम जैसे थे स्थगित ठेवण्याचे सिडकोच्या वतीने एमआरटीपी ५४ (१) अंतर्गत नोटीस बजावली होती. असे असतानाही बांधकाम सुरूच ठेवल्याने बुधवारी ४ रोजी सिडकोच्या अतिक्रमण विभागाने पोकलेनच्या साहाय्याने कारवाई करून संपूर्ण आरसीसी बांधकाम निष्कासित केले. सिडकोचे अनधिकृत बांधकामे अतिक्रमण विभागाचे मुख्य नियंत्रक डॉ. जगन्नाथ वीरकर आणि सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या आदेशानुसार पोलिस बंदोबस्तात धडक कारवाई केली.



@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in